<u>**मध्यान्नाची वेळझाल्याने तसेच आरोपींच्या विधीज्ञांना काही कागदपत्रे दाखल करणे कामी विनंती केल्याने पुढील तारखे पर्यंत तहकुब .**</u>

**श्रवणोत्तर स्वीकृती....**

**(व्ही.एन.काटकर)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**न्यायालय क्र.४, श्रीरामपूर.**

**दिनांक–१४.११.२०२५**

<u>**साक्षीदाराचा पुढील उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ पी.बी औताडे यांच्यामार्फत शपथेवर पुन्हा सुरु..**</u>

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या विरुध्द तसेच माझे भाउ व वडीलांविरुध्द श्रीरामपूर न्यायालयात ब–याच केसेस प्रलंबीत आहेत. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, एका केसचा निकाल झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गुरनं १५९/२०२१, भारतीय दंड विधान १८६० कलम ३९५, ५०४,५०६ अन्वये गुन्हा माझ्या विरुध्द दाखल झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, स्पेशल केस नं ५६/२०२३ ही केस अॅट्रॉसीटी अॅक्ट अंतर्गत कलम ३(१) एस व भारतीय दंड विधान १८६० अंतर्गत कलम ३२३, ५०४,५०६ अन्वये गुन्हा माझ्या व माझ्या विरुध्द दाखल झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. १ यांनी माझ्या विरुध्द फौजदारी केस क्र. ३८७/२०२२ जातिवाचक शिव्या दिल्या संदर्भात दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दावा क्र. २७५/२०२१ हे प्रकरण विलास होन यांनी माझ्या व माझ्या वडीलां विरुध्द मनाईहुकूमासाठी दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाजीराव ठोंबरे यांनी माझ्या व माझ्या वडील व भाउ यांच्या विरुध्द आर.सी सी ४२१/२०२३ हे प्रकरण उस पेटवल्या संदर्भात भारतीय दंड विधान १८६० कलम ४३५ अन्वये दाखल केलेले आहे.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, मी युटयुबचे चॅनल चालवितो. हे म्हणणे खरे नाही की, या चॅनलवर ब–याच गावक–यांचे आक्षेपार्ह पोस्ट टाकलेल्या आहेत. साक्षीदार

स्वतःहुन सांगतो की आरोपींचे टाकलेले आहेत, ते त्रास देत होते म्हणुन. हे म्हणणे खरे नाही की गावातील ब–याच लोकांनी माझ्या विरुध्द आक्षेपार्ह गोष्टी टाकल्यामुळे तक्रार केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की मी ब–याच सरकारी अधिका–यांच्या आक्षेपार्ह पोस्ट टाकलेल्या आहेत. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, भ्रष्टाचार संदर्भात टाकलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे गावातील ब–याच लोकांबरोबर माझे वाद आहेत.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, गट नं ३५ मौजे वांगी बुाा मध्ये आप्पासाहेब शंकर बिडगर यांची १हे ९८ आर एवढी शेत जमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं ३५ मध्ये माझ्या किंवा माझे आई वडील, माझे भाउ यांच्या नावावर कोणतीही शेत जमिन नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं ३५ मध्ये विलास होन यांच्या नावावर २ हे ३७ आर एवढी जमिन आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, ती बेकायदेशीररित्या घेतलेली आहे, आमचा वाद चालू असल्यामुळे.

**प्रश्न –** विलास होन यांनी बेकायदेशीररित्या जमिन घेतली असा कोणत्या न्यायालयाचा आदेश आहे का ?

**उत्तर –** आदेश नाही, वाद चालू असताना त्यांनी घेतली आहे.

**१५.** हे म्हणणे खरे आहे की गट नं ३५ च्या ७/१२ उता–यावरुन विलास होन यांचे नाव कमी झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं ३५ मधील विलास होन यांची जमिन अरुण रफायल पाटोळे हा कसतो. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की नवनाथ बिडगर व सचिन दांडगे, बाजीराव ठोंबरे यांनी संगनमत करुन आमच्याकडून जमिन बळकवली.

**१६.** नवनाथ बिडगर व सचिन दांडगे, बाजीराव ठोंबरे यांनी माझी जमिन बळकावली त्यासंदर्भात दिवाणी दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नवनाथ बिडगर व सचिन दांडगे, बाजीराव ठोंबरे यांनी जमिन बळकावली हे दाखविण्याकरीता माझ्या शब्दाशिवाय माझ्याशिवाय कोणताही पुरावा नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, एस.पी ऑफिसमध्ये पत्र दिले होते.

**प्रश्न–** असा पुरावा अभिलेखावर दाखल नाही?

**उत्तर –** पेनड्राइव्ह आहे.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९.१०.२०२२ रोजी सकाळी ९.३० वाजता आदेश लक्ष्मण बारसे (आरोपी क्र१) ट्रॅक्टर घेवून शेतात आले नव्हते व सुभाष पटारे यांच्या सांगण्यावरुन त्यांचा ट्रॅक्टर घेवून पाटोळे यांची शेती नांगरण्यास आला. हे म्हणणे नाही की, मी, अमोल व लक्ष्मण बिडगर यांनी आरोपी क्र. १ ला रस्त्यात अडविले. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही 'आमची शेती वरुन वाद आहे, तु कशाला ट्रॅक्टर घेवून नांगरायला जातो' असे म्हणुन आरोपी क्र. १ शी हुजगत घालत होतो. हे म्हणणे खरे नाही की मी, माझा भाउ अमोल व लक्ष्मण आम्ही ति–हांनी ट्रॅक्टर जवळ येवून, 'तु ही शेत जमिन नांगरायची नाही असे बोलून 'महारडया या अगोदर मारलेले बास झाले नाही का' धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की माझा भाउ व मी मिळून आरोपी क्र. १ ला जातीवाचक शब्द वापरुन मारहाण केली.

**प्रश्न –** घटनेवर गु.र.नं ३८१/२०२२ हा गुन्हा तुमच्या व तुमच्या भावा विरुध्द दाखल झालेला आहे?

**उत्तर –** दाखल झालेला आहे, पण तो पुर्ण खोटा आहे.

**१८.** माझे घर वांगी बुाा येथे आहे. मी गट नं ३५ मधील शेतात रहातो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराजवळ चारी आहे. हे म्हणणे खरे आहे की आम्हाला येण्या जाण्याचा रस्ता चारी जवळून आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९.१०.२०२२ रोजी आरोपी क्र. १ ला जातीवाचक शिवीगाळ केल्यानंतर आम्ही आमच्या घरी आलो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी घरी येत आहेत की काय म्हणुन मी, माझे भाउ आई वडील ट्रॉलीच्या मध्ये बसुन चारी जवळून चाललो होतो. हे म्हणणे खरे नाही की ट्रॅक्टर ट्रॉली मधुन जात असताना चारीमध्ये उलटून आम्ही पडलो त्यामुळे आम्हाला , आईला व वडीलांना दुखापत झाली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ला आम्ही जातीवाचक शिवीगाळ केली म्हणुन त्या गुन्हयाला शह देण्यासाठी आरोपीं विरुध प्रस्तुतची फिर्याद दिली.

**१९.** हे म्हणणे खरे नाही की, आर्टिकल अ,ब,क वरील लाकडी दांडे, गज व कु–हाड हे मी पोलिसांना स्वतःहुन दिलेले आहेत.

**प्रश्न –** तुमच्या विरुध्द वेगवेगळे प्रकरणे दाखल असल्यामुळे तुम्हाला कोर्टकचेरीची माहिती आहे

**उत्तर –** एवढे नाही, थोडीफार आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ आरोपींना त्रास देण्यासाठी व त्यांनी दाखल केलेल्या केसला शह देण्यासाठी आरोपींविरुध्द खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र. २ व ३ आरोपी क्र. १ सोबत रहातात म्हणुन त्यांचे नाव विनाकारणात प्रस्तुत प्रकरणात गोवले आहे. हे म्हणणे खरे नाही की सरतपासातील सर्व मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**

**फेरतपास नाही**

**श्रवणोत्तर स्वीकृती....**

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2025.12.16 11:10:38 +0530

**(व्ही.एन.काटकर)**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**

**दिनांक–१५.१२.२०२५**

**न्यायालय क्र.४, श्रीरामपूर.**